ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# महाराष्ट्र शासनाच्या नाभिक समाजाच्या योजनांचा परामर्श

**डॉ. प्रताप फलफले[1], सौरव बाळासाहेब बिडवे[2]**

[1] *मार्गदर्शक प्राध्यापक*

[2] *संशोधक*

*संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य व ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर.*

*Corresponding Author: डॉ. प्रताप फलफले*

**DOI - 10.5281/zenodo.14885868**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्यातील नाभिक समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या पारंपारिक व्यवसायात सक्रिय असून, त्यांच्या सांस्कृतिक वारसाला विशेष महत्त्व आहे. पारंपारिक व्यवसायात कार्यरत असून देखील आधुनिक काळाच्या गरजा पूर्ण करताना त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. आर्थिक मागासलेपण, शिक्षणातील मागे राहणे, रोजगाराच्या संधीचा अभाव आणि सामाजिक समरसतेच्या दिशेने होणाऱ्या संघर्षामुळे या समाजाला प्रगतीसाठी शासनाच्या विविध योजनांची आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाने नाभिक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, वस्तीगृह योजना, कौशल्य विकास योजना अशा अनेक धोरणात्मक योजना आखल्या आहेत. या योजना त्यांना आधुनिक समाजामध्ये स्थिरपणे उभे राहण्यासाठी सक्षम बनवतात.

**नाभिक समाजासाठी योजना:**

1. **नाभिक समाजासाठी योजना:**
2. **शिक्षण विषयक योजना:**
   - **शिष्यवृत्ती योजना:**

     शाळा महाविद्यालय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती. उच्च शिक्षणासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना.
   - **व्यावसायिक अभ्यासक्रम:**

     औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणासाठी अनुदान.

     नाभिक समाजाच्या व्यवसायासाठी संबंधित कोर्सेस साठी विशेष सुविधा.
   - **विद्यार्थी वस्तीगृह योजना:**

     नाभिक समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी शासन अनुदानित वस्तीगृह.

     निवासी शाळांची सुविधा.
   - **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन:**

     एमपीएससी यूपीएससी परीक्षा साठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र.
3. **आर्थिक योजना:**
   - **स्वयंरोजगार योजना:**

महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ अंतर्गत व्यवसायासाठी कमी व्याजदराचे कर्ज. स्वयंपूर्ण योजना अंतर्गत व्यवसायासाठी भांडवल व प्रशिक्षण. पारंपारिक नाभिक व्यवसायासाठी आधुनिक साधनसामग्री खरेदीसाठी आर्थिक मदत.

   - **उद्योग प्रोत्साहन योजना:**

     लघु व मध्यम उद्योगासाठी अनुदान.

     व्यावसायिक उपक्रम सुरू करण्यासाठी अनुदान व सवलती.

- **महिला सक्षमीकरण योजना:**

  नाभिक समाजातील महिलांसाठी स्वयंसेवी बचत गट.

  महिलांसाठी विशेष व्यवसाय प्रशिक्षण केंद्र.

4. **सामाजिक योजना:**

- **सामूहिक विवाह योजना:**

  नाभिक समाजातील जोडप्यांसाठी शासनाच्या वतीने सामूहिक विवाह कार्यक्रम योजना.

- **वैयक्तिक व कौटुंबिक मदत:**

  आरोग्य विमा योजना व अपघात विमा योजना

- **घरे व पायाभूत सुविधा योजना:**

  प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घर बांधण्यासाठी मदत. नाभिक समाजासाठी विशेष वस्ती सुधारणा योजना.

- **सामाजिक न्यायासाठी आरक्षण:**

  शैक्षणिक संस्था व नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ. अनुसूचित जाती जमातींसाठी असलेल्या योजनांमध्ये विशेष सवलती.

5. **अतिरिक्त महत्त्वाच्या योजना:**

- **राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त विकास महामंडळ:**

  मागासवर्गीयांसाठी रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढवण्यासाठी आर्थिक मदत.

- **आरोग्य योजना:**

  नाभिक समाजातील कुटुंबांना मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार सुविधा.

- **कौशल्य विकास योजना:**

  नाभिक व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानात सोबत जोडण्यासाठी प्रशिक्षण व नव्या व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाचे कौशल्य प्रशिक्षण केंद्र.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्र शासनाच्या नाभिक समाजाच्यासाठीच्या योजनांनी या समाजाच्या प्रगतीसाठी अनेक सकारात्मक परिणाम घडवून आणले आहेत. शिक्षणांच्या क्षेत्रात शिष्यवृत्ती, वस्तीगृह योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यामुळे अनेक विद्यार्थ्यांना नवीन दिशा मिळाली आहे. व्यावसायिक सक्षमकरण्यासाठी स्वयंरोजगार योजना आणि आर्थिक सहाय्य उपक्रम उपयुक्त ठरले आहे. महिलांसाठीच्या सक्षमीकरण योजना आणि  कौशल्य प्रशिक्षणामुळे महिला देखील आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होत आहे. मात्र या योजनांचा पूर्ण लाभ समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रयत्नांना अधिक गती देण्याची गरज आहे. जागरूकता निर्माण करून लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन दिल्यास योजनांचा अधिकाधिक प्रभाव वाढू शकतो.

**सारांश:**

नाभिक समाजाच्या प्रगतीसाठी महाराष्ट्र शासनाने आखलेल्या विविध योजनांनी समाजाला संशय बनवण्यासाठी एक सकारात्मक दिशादर्शक कार्य केले आहे. या योजनांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार महिलांचे सक्षमीकरण तसेच सामूहिक विकासाच्या उद्दिष्टांचा समावेश आहे. पारंपारिक व्यवसायाच्या आधुनिकीकरण व कौशल्य विकास तसेच आधुनिक काळातील तंत्रज्ञानाचा वापर यावर आधारित या योजना या समाजाला नवे युगातील आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करत आहे. तरीदेखील या योजनांचा

प्रभाव संपूर्ण समाजावर समानतेने पडण्यासाठी त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर सरकार स्वयंसेवी संस्था व सामुदायिक घटकांचा समन्वयक वाढवल्यास नाभिक समाजाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित होईल.

**संदर्भसूची:**

1. महाराष्ट्र शासनाच्या आधिकृत योजनांची माहिती पुस्तिका.
2. सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र
3. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचे अहवाल.
4. विविध स्वयंसेवी संस्थांचे अभ्यास अहवाल राज्य शासकीय परिपत्रके व आदेश.